# होमगार्ड बनन्याची सुवर्ण संधी

मा. महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या आदेशाने व जिल्हा समादेशक होमगार्ड चंद्रपुर यांच्या अध्यक्षते खाली दिनांक १०/७/२०१९ रोजी संपुर्ण चंद्रपुर जिल्हयांची पुरूष व महीला उमेदवाराची होमगार्ड भरती 'पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथिल कवायत मैदानावर' राबविण्यात येणार आहे.

सदर भरती करीता स्थानिक पो. स्टेशन येथील २० ते ५० वयोगटातील उमेदवार आणि जर स्थानिक पो. स्टेशन येथील उमेदवार उपलब्ध न झाल्यास जवळपास च्या गावातील उमेदवारांना शैक्षणिक पात्रते नुसार तसेच शारिरीक चाचणी व्दारे भरती करण्यात येणार आहे. होमगार्ड नोंदणी पात्रते करीता उमेदवार हा ईयत्ता १० वी असावा तसेच पुरूषांकरीता उंची १६२ सेमी. तर महिलां करीता उंची १५० सेमी. आवश्यक आहे. तसेच उमेदावारांनी नोंदनिच्या वेळेस शाळा सोडल्याचा दाखला मुळ प्रत, रहिवासी दाखला, तहसिलदार यांचे कडील राशन कार्ड, आधार कार्ड, २ पासपोर्ट साईज फोटो इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहे.

सदर सेवेचा पदावधी कालावधी हा ३ वर्षाचा असुन जिल्हयातील जास्तित जास्त उमेदवारांनी या संधिचा लाभ घ्यावा असे आव्हान चंद्रपुर जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. प्रशांत खैर यांनी उमेदवारांना केले आहे.

---